| शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य | सत्यमेव जयते | Government of Maharashtra DIRECTORATE OF EDUCATION (Secondary & Higher Secondary) Maharashtra State |
|---|---|---|
| मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | महाराष्ट्र शासन | Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com


परिपत्रक

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/ 4283
दिनांक-२९/०७/२०२२

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर

**विषय:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**
इ.१०वी श्रेणी/गुणपत्रके, गुणवत्ता यादी, ATKT प्रवेश, दिव्यांग विद्यार्थी प्रवेश, Transfer of Credits, इत्यादी बाबी विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे अर्ज Verify करणे व इतर प्रवेशाचे कार्यवाहीबाबत.

**संदर्भ:- शासन पत्र क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.२३/०६/२०२२**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका या पाच महानगर क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. विविध शिक्षण मंडळांचे इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थी सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होत आहेत, काही मंडळाचे गुणपत्रकातील श्रेणीचे गुणांमध्ये रुपांतर करणे आवश्यक आहे. इ.११वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याचे अचूक Verification करता यावे व संपूर्ण प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी शासन / राज्यमंडळाचे निकष तसेच इतर प्रचलित बाबीचे अनुषंगाने पुढील सूचनांचे पालन करावे व इ.११वी प्रवेश प्रक्रियेबाबत प्रत्येक घटकाने तत्पर कार्यवाही करावी.

| क्र | बाब | इ.११वी प्रवेशाची कार्यपद्धती |
|---|---|---|
| १ | निकाल ऑनलाईन जाहीर झालेला आहे परंतु मंडळाकडून इ.१०वी गुणपत्रके प्राप्त नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी. | १. ज्या परीक्षा मंडळांचे निकाल विलंबाने जाहीर होतात अशा विद्यार्थ्यांना इ.१०वी निकाल जाहीर झाल्यानंतर त्या-त्या वेळी प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर ऑनलाईन अर्ज भरुन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.<br>२. निकाल जाहीर झालेनंतर मूळ गुणपत्रक मिळणेस विलंब होणार असल्यास संबंधित परीक्षा मंडळाकडून ऑनलाईन प्राप्त झालेली गुणपत्रके ग्राह्य समजण्यात येतील. त्यासाठी, अशा विद्यार्थ्यांनी गुणांचा तपशील DigiLocker वर उपलब्ध असल्यास त्याची प्रत घेऊन अपलोड करावी अथवा मंडळाच्या पोर्टलवरुन मिळणारी प्रत आपल्या माध्यमिक शाळेकडून प्रमाणित करुन घ्यावी व ती अपलोड करावी. |
| २ | श्रेणी स्वरुपात गुणपत्रक असल्यास, श्रेणींचे गुणांमध्ये रुपांतर करणे तसेच ११वी प्रवेशासाठी एकूण गुण ग्राह्य धरणे, सर्वोत्तम पाच/ Best Five सुविधेबाबत. | १. सर्वोत्तम पाच विषयांचे गुण ग्राह्य धरण्याची Best Five तरतूद, केवळ महाराष्ट्र राज्यमंडळाच्या Fresher विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>२. CBSE साठी प्रचलित पद्धतीनुसार मुख्य पाच विषयांचे (५०० पैकी) एकूण गुण ग्राह्य धरावेत, अतिरिक्त विषय हा ऐच्छिक असलेमुळे तो सक्तीचा नाही.<br>३. ICSE मंडळाच्या विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना पोर्टलवर देण्यात आलेली आहे, त्यांना शासन पत्र दि.२९/०६/२०१९ नुसार पुढील पर्याय उपलब्ध आहेत.<br>अ)सात विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे ७०० पैकी गुण ग्राह्य धरावेत आणि<br>ब) गट एक व गट दोन मधील सहा अथवा पाच विषय घेतलेले असल्यास सर्वोत्तम पाच विषयांचे ५०० पैकी गुण ग्राह्य धरावेत.<br>**४. याशिवाय अन्य मंडळाचे सर्व विषयांचे गुण एकत्रित ग्राह्य ठरतील.**<br>५. इतर राज्याची अथवा भारताबाहेरील काही शिक्षण मंडळांची इ.१०वी उत्तीर्ण प्रमाणपत्रे श्रेणी स्वरुपात आहेत. सदर विद्यार्थ्यांना इ.११वी मध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांचे इ.१०वी श्रेणींचे गुणांमध्ये रुपांतर करणे आवश्यक आहे. त्याकरीता सबंधित मंडळाचे निकषानुसार श्रेणींचे गुणांमध्ये रुपांतर करावे. (रुपांतरणाचे निकष मंडळाने दिले नसल्यास त्यांचे Grade Scale मधील गुणांचा सरासरी/ मध्य बिंदू ग्राह्य मानावा)<br>**६. ICSE व IGCSE मंडळाचे विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना गुणपत्रकातील श्रेणी-गुण रुपांतरित करण्याची सुविधा पोर्टलवर देण्यात आलेली आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | इ.१०वी परीक्षेमध्ये किमान एक भाषा व इतर ऐच्छिक विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत. | **१. राज्यमंडळाच्या इ.११वी मध्ये प्रवेश मिळण्यासाठी इ.१०वी/ समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह, किमान पाच विषयांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**<br>२. शासन निर्णय दि.०८/०१/२०१६ अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांना एक भाषा विषय अनिवार्य व इतर कोणतेही पाच विषय घेऊन इ.१०वी परीक्षेमध्ये बसणेस परवानगी देण्यात आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांना इ.११वी प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल. परंतु,<br>३. ज्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषय न घेता इ.१०वी उत्तीर्ण केलेली आहे अशा विद्यार्थ्यांना शासन पत्र दि.१३/०७/२०१५ नुसार ATKT विद्यार्थ्यांप्रमाणे सवलत लागू आहे.<br>४. अशा विद्यार्थ्यांनी पुढील वर्षात इ.१०वी चा इंग्रजी विषय स्वतंत्रपणे (Isolated) घेऊन लगतच्या सलग दोन परीक्षांच्या संधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. इंग्रजी विषय उत्तीर्ण होईपर्यंत त्यास इ.११वी चा निकाल दिला जाणार नाही व तोपर्यंत असे विद्यार्थी इ.१२वी मध्ये प्रवेशास पात्र असणार नाहीत. |
| ४ | इ.१०वी गुणपत्रिकेमध्ये (KSA) Transfer of Credit. आणि Pass with Transfer of Credits असे नमूद करुन उत्तीर्ण घोषीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे इ.११वी प्रवेशाबाबत. | **१. इ.११वी विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने इ.१०वी परीक्षेत विज्ञान आणि तंत्रज्ञान विषय उत्तीर्ण केलेला असणे अनिवार्य राहील.**<br>२. शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ नुसार **"कौशल्य सेतू"** अंतर्गत इ.१०वी गुणपत्रकात Pass with Transfer of Credits असा शेरा असणारे व इंग्रजी विषयासह किमान पाच विषयांत इ.१०वी/ समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणारे विद्यार्थीही इ.११वी प्रवेशासाठी पात्र आहेत. तथापि,<br>३. गणित विषयासाठी Transfer of Credit घेऊन इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास इ.११वी मध्ये गणित विषय घेता येणार नाही<br>४. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज तपासतांना इ.१०वी गुणपत्रिकेमध्ये KSA वगळून जेवढया विषयांचे गुण दर्शविलेले असतील त्यांची एकूण करुन त्याचे रुपांतर ५०० पैकी करण्यात यावे व सदर गुण हे इ.११वी प्रवेश प्रकियेसाठी ग्राह्य धरावेत. |
| ५ | प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणेची सुविधा. | इ.११वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने भरलेल्या प्रवेश अर्जातील माहितीची पडताळणी मार्गदर्शन केंद्रांमार्फत करुन अर्ज Verify केला जातो. आवश्यक प्रमाणपत्रे पोर्टलवर अपलोड केल्यामुळे अर्ज त्वरीत ऑनलाईन Verify करणे शक्य होते. सबब आवश्यक सर्व प्रमाणपत्रे अपलोड करणेची सुविधा पोर्टलवर विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. यामुळे अर्ज पडताळणीसाठी संबंधित मार्गदर्शन केंद्र अथवा शाळेस समक्ष भेट न देताही अर्ज प्रमाणित केले जाऊ शकतात<br>टीप- एखाद्या विद्यार्थ्याचा अर्ज Auto Verify झाला असल्यास असे अर्ज Verify करुन घेण्याची आवश्यकता नाही.<br><br>**विद्यार्थ्याने पुढील प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.**<br>**अ) प्रवेश अर्ज भाग-१ भरतेवेळी- Upload**<br>१. सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी-<br>स्वत:चा जातीचा दाखला, तो नसल्यास वडीलांचा जातीचा दाखला.<br>२. EWS आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी-<br>आर्थिक दुर्बल घटक EWS प्रमाणपत्र (पालक व पाल्याचे नाव)<br>२. समांतर/ विशेष आरक्षणाचा लाभ हवा असल्यास तसे प्रमाणपत्र (स्वत:चे).<br>३. माहिती अचूक भरलेबाबत स्वयं घोषणापत्र (Undertaking).<br>४. विद्यार्थ्याचे इयत्ता.१०वी चे गुणपत्रक. (राज्यमंडळाचे Fresher वगळून)<br>*** कोणती प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे याचा तपशील अर्ज भरतांना पोर्टलवर दर्शविला जातो. एखाद्या विद्यार्थ्यास अपलोड ऑप्शन आला नसल्यास त्यांना अपलोड आवश्यक नाही. तसेच,**<br>*** सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला महाराष्ट्रातील असणे आवश्यक आहे.**<br><br>**ब) Allotment नंतर प्रवेशास जाणेपूर्वी-Upload+Submit**<br>१. इ.१०वी माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला<br>२. विद्यार्थ्याचे इयत्ता.१०वी चे गुणपत्रक.<br>३. स्वत:चा जातीचा दाखला (वडीलांचा अपलोड केलेला असल्यास)<br>४. Non-Creamy Layer प्रमाणपत्र (नसल्यास ३ महिने मुदत हवी असल्यास हमीपत्र)<br><br>**आपणास लागू असणारी प्रमाणपत्रे / दाखले वेळेत मिळवून ठेवणे हिताचे आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ६ | विद्यार्थ्यांचे इ.१०वी गुणपत्रकामध्ये अतिरिक्त गुण नमूद होणे अथवा पुनर्तपासणी मध्ये गुणांमध्ये बदल झाल्यास करावयाची कार्यवाही. | १. इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुण व इतर माहिती विद्यार्थी अर्ज भरतांना घेण्यात आलेली आहे. परंतु त्यानंतर काही विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळाकडून अतिरिक्त गुण दिले गेल्यास अथवा पुनर्तपासणी मध्ये त्यांचे गुणांमध्ये बदल झाल्यास. अशा विद्यार्थ्यांचे बाबतीत सुधारित गुणांची नोंद करण्याची सुविधा पोर्टलवर शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे.<br>२. विद्यार्थ्यांनी त्यांचे सुधारित गुणपत्रक Grievance द्वारे शिउसं यांना पाठवावेत. त्यानुसार अचुक गुण नोदवून सुधारित गुणपत्रक अपलोड करावे, त्यानुसास शिउसं यांनी ऑनलाईन दुरुस्ती करावी. सदर कार्यवाही गुणवत्ता यादी अंतिम करणेपूर्वी होणे आवश्यक आहे. |
| ७ | ATKT पात्र विद्यार्थ्यांसाठी इ.११वी प्रवेश. | इ.१०वी मध्ये ATKT सवलत मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी **विशेष फेरीनंतर** स्वतंत्र फेरीचे आयोजन करण्यात येईल. (शा.नि. दि.०७/०३/२०१९).<br>अशा विद्यार्थ्यांना विशेष फेऱ्यांनंतर अर्ज (Part-१) भरणे तसेच विकल्प (Part-२) भरण्याची सुविधा देण्यात येईल, तसे त्यावेळच्या वेळापत्रकात नमूद असेल. |
| ८ | विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज वेळेत व अचूक प्रमाणित करणे. | विद्यार्थ्याने भरलेल्या प्रवेश अर्जातील माहितीची पडताळणी, अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे केली जाते. तथापि अर्जाची पडताळणी होण्यासाठी विलंब होणे तसेच Verification अचूक न होणे या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यास अर्जाचा भाग-२ वेळेत भरता येत नाही अथवा त्यास प्रवेश नाकारला जाऊ शकतो. सदर बाबी टाळणे आवश्यक आहे. या बाबत संबंधितांनी अर्ज Verification ची कार्यवाही अचूक व वेळेत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. |
| ९ | आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इ.११वी प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे. | **१. सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातीचा दाखला सादर करणे आवश्यक असेल. विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा दाखला अद्याप मिळाला नसल्यास वडीलांचा जातीचा दाखला ग्राह्य धरता येईल.**<br>**२. EWS प्रवर्गाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**<br>**३. VJ-NT, OBC, SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना** प्रवेशासाठी जातीच्या दाखल्यासोबत उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे Non-Creamy Layer प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, शासन पत्र दि.२३/०६/२०२२ अन्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्याची मुदत देण्यात आलेली आहे.<br>विद्यार्थ्यांनी उपलब्ध असलेली सर्व प्रमाणपत्रे अपलोड करावीत आणि (NCL) प्रमाणपत्र नसल्यास ते मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाची पोच/Receipt व हमीपत्र घ्यावे, त्या आधारे विद्यालयांना प्रवेश देता येतील. सदर विद्यार्थ्यांनी तीन महिन्यात (NCL) प्रमाणपत्र अपलोड/सादर करणे आवश्यक राहील अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील.<br>**टीप- ज्या विद्यार्थ्यांच्या (कोणत्याही करणाने) NCL प्रमाणपत्र मिळणारच नसेल अशा विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरणे योग्य आहे.** |
| १० | प्रवेशावेळी आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थी यांनी यांची कागदपत्रे पडताळणीबाबत. | प्रवेशावेळी आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित विद्यालयांनी काळजीपूर्वक करुन त्यानंतरच प्रवेश देण्याची कार्यवही करावी.<br>खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळाला असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रवर्गाचे अनुषंगाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असणार नाही. |
| ११ | प्रशिक्षण व उद्बोधन | प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर करावयाची कार्यवाही याबाबत सर्व संबंधित यांना सविस्तर सूचना व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. यामुळे येणाऱ्या शंका व संभ्रम दूर होईल. यासाठी मार्गदर्शन केंद्र, कनिष्ठ महाविद्यालये, पालक यांचे पुरेसे उद्बोधन करावे.<br>प्रवेश देतांना उच्च माध्यमिक विद्यालयांनी विद्यार्थ्याने दिलेल्या माहितीची पुन:श्च काळजीपूर्वक तपासणी करुन सुलभ रितीने विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावेत. |

विभागीय प्रवेश समिती सदस्य व इतर तज्ज्ञ/अनुभवी व्यक्तिंची मते जाणून घ्यावीत व आलेल्या सूचना संचालनालयास वेळोवेळी कळवाव्यात. सोबत दिलेल्या सूचना तसेच यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार संपूर्ण कार्यवाही करणेत यावी. सदर परिपत्रक इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी जारी करणेत येत आहे.

MPalkar

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव.**
**विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर.**

महाराष्ट्र शासन

क्र. प्रवेश- ०४२२/प्र.क्र.४१/ एसडी- २
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २३ जुन, २०२२.

प्रति,

संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

विषय:- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया २०२२-२३ साठी प्रवेश प्रक्रीयेचे वेळापत्रक तसेच NCL प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र.विद्या-ए-१/११-प्रवेश/२०२२/४१८१, दि.२०.०६.२०२२.

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इतर मंडळाचे निकाल जाहीर झाल्यानंतरच इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रीया (allotment) सुरु करण्यात यावी.

तसेच सन २०२२-२३ च्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (NCL) उपलब्ध असतील असे विद्यार्थी सदर प्रमाणपत्रे अपलोड/सादर करु शकतील. तथापि, सदर प्रमाणपत्रे अर्ज भरतेवेळी अपलोड/सादर करणे बंधनकारक करण्यात येऊ नये. काही तांत्रिक बाबींमुळे विद्यार्थी NCL प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास अशा विद्यार्थ्यांकडून हमीपत्र भरुन घेण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांना NCL प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्याची मुदत देण्यात यावी.

(विवेक सपकाळ)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.